अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०५ चा सरतपास
मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की,

माझे नांव :– ॲलेक्स इतोरीन सील्वेरा, वय :– ३८ वर्षे,

धंदा :– टॅक्सीचालक, राहणार :– कोलझर, ता. दोडामार्ग.

**सरतपास सरकारतर्फे विशेष सहा. सरकारी अभियोक्ता श्री. ए. व्ही. पेडणेकर यांचेकडून सुरु** –

मला नवीन टॅक्सी घेण्याकरीता कर्जाची गरज होती. त्याबाबत मी माझा मीत्र सगुण परवार याला सांगितले असता त्याने मला माहिती दिली की, त्याचा मीत्र अमित गवस याची पत्नी सासोली येथे राहत असून तीच्या जवळ एक समीक्षा ठाकुर नावाची राहणारी मुलगी ३ टक्क्याने कर्ज देते. त्यानंतर मी तिचा फोननंबर प्राप्त करुन दोडामार्ग मध्ये येऊन तिच्याशी संपर्क साधला व ०५ एप्रिल २०२३ रोजी सकाळी ११:३० वा. मी तिच्या घरी गेलो. तिने मला माहिती दिली की, रु.१,००,०००/– लोन करीता ८,५००/–रु. प्रोसेसींग फी म्हणुन लागेल. मी तिला १०,००,०००/– रुपयांच्या कर्जाची मागणी केली व तीने मला ८५,०००/– रु. प्रोसेसींग फी म्हणुन लागेल. तसेच तिने मला पॅनकार्ड आधारकार्ड, ६ महिन्यांचे स्टेटमेंट व तीन फोटो असे कागदपत्र लागणार असल्याचे सांगितले. त्याचवेळेस तिने मला सांगितले की, अर्थग्रुपची दिशा फायनान्स कंपनीमार्फत आम्ही पैसे देतो असे सांगितले. तसेच तिने मला सांगितले की, १५ एप्रिल पर्यंत पैसे दिल्यानंतर लोन मिळेल असे सांगितले. म्हणुन मी तिला त्याच दिवशी रोख रक्कम रु.७५,०००/– व जी.पे.द्वारे रु.१०,०००/– असे एकुण रु.८५,०००/– दिले. त्यावेळेस तिने मला

रु.८५,०००/– ची पावती दिली, माझी फॉर्मवर सही घेतली. त्यानंतर १५ तारीख उलटुन गेल्यानंतर आम्ही तिला दोन–तीन वेळा फोन केले असता तिने मला सांगितले की, कर्ज २–३ महिन्यांत मिळेल. तसेच तिने आम्हाला माहिती दिली की, तिने तिचे कमीशन काढुन मुंबई येथील परब यांना रक्कम पाठविली. त्याचबरोबर तिने आम्हाला माहिती दिली होती की, तिची कंपनी मुंबई येथे असुन लवकरच म्हापसा येथे कंपनी येणार आहे व ती सध्या घरातुनच काम करत आहे. त्यानंतर मला महिन्याभरानंतर समजले की, तिने अनेक लोकांचे पैसे घेऊन बुडवले आहे व त्यानंतर आम्हाला जाणवले की, तिने आमची फसवणुक केलेली आहे. समीक्षा ठाकुर हिला पाहिल्यास मी ओळखु शकतो. ती आज रोजी न्यायालयात हजर आहे. दिलेली पावती पाहिल्यास मी ओळखु शकतो. आता मला सदरची पावती दाखविण्यात आली. त्यावर समीक्षा हिची सही दिसुन येते व त्यावर दिशा ग्रुपचा शिक्का आहे. तिने माझ्या समक्ष सही केली असल्याने मी तिची सही ओळखु शकतो. सबब, त्यास **निशाणी क्र. P–5/PW5** देण्यात येत आहे. तसेच पोलीसांना रक्कम रु.१०,०००/– चा स्क्रीनशॉर्ट दिलेला होता.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. एस्. ए. गवस यांचेकडून सुरु –**

२) हे म्हणणे खरे नाही की, या प्रकरणाचा फिर्यादी कोण आहे हे मला सांगता येणार नाही. अमित गवस हा मुख्य तक्रारदार असुन त्याच्या बरोबर आम्ही सर्वांनी तक्रार केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, तक्रारीवर माझी सही नाही. हे

म्हणणे बरोबर आहे की, अभिलेख पाहता, तक्रारीवर माझी सही दिसुन येत नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, जी काय माझी फसवणुक झाल्याचे मी सांगत आहे, त्याबाबत मी माझी तक्रार नोंदविली नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, अमित गवस नावाच्या व्यक्तीची माझ्या समक्ष फसवणुक झालेली नाही.

३) हे म्हणणे बरोबर आहे की, नि.क्र.P–5/PW5 वर समीक्षा ठाकुर हिचे नाव नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, नि.क्र.P–5/PW5 वरील सही समीक्षा ठाकुरचीच आहे असे दर्शविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या तोंडी म्हणण्या व्यतिरीक्त कोणताही पुरावा त्याबाबतचा माझ्याकडे नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, दिशा ग्रुप अस्थित्वात असल्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा आम्ही पाहिलेला नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, दिशाग्रुपचे संचालक कोण, मालक कोण, रजिस्ट्रेशन नंबर काय याबाबत मी वैयक्तीक खात्री केलेली नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, समीक्षा ठाकुरचा दिशा ग्रुपशी संबंध दर्शविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा माझ्याजवळ नाही.

४) हे म्हणणे बरोबर आहे की, मी सांगत असलेले पैसे दिल्याबाबतचा कोणताही करार आमच्यामध्ये झाला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी, समीक्षा ठाकुर हिला ८५,०००/– रु. दिले व तिने मला पावती सही करुन दिली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, समीक्षा ठाकुरने माझी कधीही फसवणुक केलेली नाही.

७) हे म्हणणे खरे नाही की, मला नवीन टॅक्सी घेण्याकरीता कर्जाची गरज होती व त्याबाबत मी माझा मीत्र सगुण परवार याला सांगितले असता त्याने मला माहिती दिली की, त्याचा मीत्र अमित गवस याची पत्नी सासोली येथे राहत असून तीच्या जवळ एक समीक्षा ठाकुर नावाची राहणारी मुलगी ३ टक्क्याने कर्ज देते, असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर मी तिचा फोननंबर प्राप्त करुन दोडामार्ग मध्ये येऊन तिच्याशी संपर्क साधला व ०५ एप्रिल २०२३ रोजी सकाळी ११:३० वा. मी तिच्या घरी गेल्याबाबत खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, तिने मला माहिती दिली की, रु.१,००,०००/- लोन करीता ८,५००/-रु. प्रोसेसींग फी म्हणुन लागेल त्यानंतर मी तिला १०,००,०००/- रुपयांच्या कर्जाची मागणी केली व तीने मला ८५,०००/- रु. प्रोसेसींग फी म्हणुन लागणार असल्याबाबत खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, तसेच तिने मला पॅनकार्ड आधारकार्ड, ६ महिन्यांचे स्टेटमेंट व तीन फोटो असे कागदपत्र लागणार असल्याचे व अर्थग्रुपची दिशा फायनान्स कंपनीमार्फत आम्ही पैसे देतो आणि १५ एप्रिल पर्यंत पैसे दिल्यानंतर लोन मिळेल असे सांगितल्याबाबत खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी त्याच दिवशी रोख रक्कम रु.७५,०००/- व जी.पे.द्वारे रु.१०,०००/- असे एकुण रु.८५,०००/- दिले व त्यावेळेस तिने मला रु.८५,०००/- ची पावती देऊन फॉर्मवर सही घेतल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर १५ तारीख उलटुन गेल्यानंतर आम्ही तिला दोन-तीन वेळा फोन केले असता तिने मला सांगितले की, कर्ज २-३ महिन्यांत मिळेल तसेच तिने आम्हाला माहिती दिली की,

तिने तिचे कमीशन काढुन मुंबई येथील परब यांना रक्कम पाठविली, असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्याचबरोबर तिने आम्हाला माहिती दिली होती की, तिची कंपनी मुंबई येथे असुन लवकरच म्हापसा येथे कंपनी येणार आहे व ती सध्या घरातुनच काम करत आहे, असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर मला महिन्या भरानंतर समजले की, तिने अनेक लोकांचे पैसे घेऊन बुडवले आहे व त्यानंतर आम्हाला जाणवले की, तिने आमची फसवणुक केलेली आहे, असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, समीक्षा ठाकुर हिला न्यायकक्षात ओळखल्याबाबत मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.P–5/PW5 वरील दिलेली पावती मी न्यायकक्षात ओळखल्याबाबत खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांना रक्कम रु.१०,०००/– चा स्क्रीनशॉर्ट दिलेला होता, असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती,

ठिकाणः– दोडामार्ग. (वाय. पी. बावकर)

दिनांकः– ०७/०४/२०२६. न्यायदंडाधिकारी वर्ग–१, दोडामार्ग.